# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** सोलापुर शहर **P.S.(ठाणे):** सदर बाज़ार **Year (वर्ष):** 2019
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0103 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 04/02/2019 23:34 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** सोमवार **Date From (दिनांक पासून):** 04/02/2019
**Time Period (कालावधी):** पहर 6 **Date To ( दिनांक पर्यंत):** 04/02/2019
**Time From (वेळेपासून):** 17:30 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 17:30 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 04/02/2019 **Time (वेळ):** 23:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**
**Entry No. (नोंद** 042 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 04/02/2019 23:34 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्तळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** उत्तर, 02 किमी
**Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** भूसंपादन कार्यालय क्र 1,सोलापूरच्या कार्यालयात,सोलापूर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नांव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**
(a) **Name (नाव):** संजय बाबू राठोड
(b) **Father's Name (वडील का नाव) :** बाबू राठोड
(c) **Date/Year of Birth (जन्म** 1987 (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत
(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**
(f) **Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (अदा केल्याची तारीख):**
**Place of Issue (अदा केल्याची ठिकाण):**
(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |



Scanned by CamScanner

(h) **Address** (पत्ता):

| S.No.(अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | नागूर तांडा, मैंदर्गी,ता अक्कलकोट,जि सोलापूर ,सोलापुर ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | नागूर तांडा, मैंदर्गी,ता अक्कलकोट,जि सोलापूर ,सोलापुर ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.): **Mobile** (मोबाइल नं.):

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | नरसिंह एकनाथ कुलकर्णी | | वडील का नाम : एकनाथ कुलकर्णी | 1. 47 बी, अंत्रोळीकर नगर,भाग - 1, होटगी रोड,सोलापूर,सदर बाज़ार, सोलापुर शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | सलीम चाँदसाहेब शेख | | वडील का नाम : चाँदसाहेब शेख | 1. मंद्रुप, ,ता दक्षीण सोलापूर,सोलापूर, सोलापुर ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11 **Inquest Report / U.D. case No., if any** (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents** (प्रथम सूचना तथ्य ):

जबाब दि. 04.02.2019 मी संजय बाबू राठोड, वय 32 वर्षे, व्यवसाय शेती, रा.नागूर तांडा, मैंदर्गी, ता. अक्कलकोट, जि.सोलापूर समक्ष फिर्यादी जबाब देतो की, मी वरील ठिकाणी माझे आई वडील, दोन भाऊ व पत्नी मुलासंह राहण्यास असून आम्ही आमची शेती करून व मजूरी करून आमचे कुटूंबाचा उदरनिवाह करतो. माझ्या व माझी आई सुरेखा बाबू राठोड हिच्या नावे मैंदर्गी, ता.अक्कलकोट येथे शेती गट नं 348/1 मध्ये शेती आहे. सदर जमिनीचा वेगळा 7/12 उतारा आहे. सदर शेती गट नं 348/1 मधून सोलापूर ते गुलबर्गा राष्ट्रीय महामार्गच्या विस्तारीकरणसाठी सुमारे 1900 चौ.मी क्षेत्र संपादीत करण्यात आलेले आहे. त्याबाबत मा.सक्षम प्राधिकारी तथा उपजिल्हाधिकारी भूसंपादन क्र 1,सोलापूर यांचेकडील क्रमांक उभूसंअ/1/रा.म./150/एस.आर./क्र20/2018कावि/1316 दिनांक 04.12.2018 अन्वये नोटीस 1) सुरेखा बाबू राठोड, 2) संजय बाबू राठोड, 3) चंद्रकांत लक्ष्मण चिक्कळी, 4) ईरम्मा हणमंत चिक्कळ्ळी, 5) शिवम्मा परशुराम जमखंडी, 6) मल्लम्मा प्रकाश चिमणगेरी व 7) शिवलिंगप्पा हणमंत चिक्कळ्ळी, रा.मैंदर्गी यांना काढून जमिनीचा मोबदला 49,64,700/-रूपये मिळत असल्याबाबत नोटीस दिलेली आहे. परंतू सदर नोटीसवर या गट नं 348 मधील सर्व लोकांची नावे आहेत. परंतू प्रत्यक्षात महामार्गाकरीता फक्त माझ्या नावे असलेल्या गट नं 348/1 मधील 1900 चौ.मी. क्षेत्र रस्त्यासाठी जात असताना व सदर गटाचा वेगळा 7/12 उतारा असताना देखील नोटीसमध्ये इतर लोकांची चूकीच्या पध्दतीने नावे आहेत. सदर चूकीची नोटीस काढली असल्याने ती दुरूस्त होवून तसेच प्रत्यक्षात मोजणी करून जमीन कोणाची गेली आहे याची तपासणी करून दुरूस्ती होण्याबाबत मी मा.सक्षम प्राधिकारी तथा उपजिल्हाधिकारी भूसंपादन क्र 1, सोलापूर यांच्या कार्यालयातील नायब तहसीलदार श्री.कुलकर्णी व लिपीक श्री. शेख यांची वारंवार भेट घेवून तसेच त्यांना लेखी पत्र देवून माझी रक्कम मला मिळण्याबाबत चर्चा व पत्रव्यवहार करीत होतो. त्यामध्ये श्री.कुलकर्णी यांनी सदरची नावे ही भूमी अभिलेख कार्यालय, अक्कलकोट यांचेकडून प्राप्त झालेली असून त्यामुळे ती नावे नोटीसवर आलेली आहेत. यामुळे सदर जमिनीची पुन्हा भूमीअभिलेख कार्यालयाकडून मोजणी होवून प्रत्यक्षात ज्यांची शेती गेली आहे. त्यांची नावे प्राप्त झाल्यानंतर त्यांच्या नावे नोटीस काढण्यात येण्याची प्रक्रिया करावी लागणार असल्याचे श्री. कुलकर्णी व श्री. शेख यांनी माहिती दिली. त्यावरून त्यांनी मला सदर प्रक्रिया मोठी असून त्यासाठी खर्च येणार असल्याचे सांगितले. त्यावेळी त्यांनी माझ्याकडे 10,000/- रूपये लाच मागितली होती. त्यांना लाच दिल्या शिवाय माझे काम होणार नसल्याने मी त्यांना नाईलाजाने 10,000/- रूपये दिलेले आहेत. परंतू त्यांनी त्यावर काही कार्यवाई केली नाही. त्यामुळे आज दि.04.02.2019 रोजी भूसंपादन कार्यालयात जावून भेट घेतली असता त्यांनी सदर काम करण्यासाठी नवीन एक अर्ज द्यावा लागेल व त्यावर पुढील कार्यवाही

Scanned by CamScanner

करण्यासाठी पुन्हा 500/- रूपये लाचेची मागणी केली त्यांना यापुढे लाच देण्याची माझी अजिबात इच्छा नसल्याने मी ॲन्टी करप्शन ब्युरो, सोलापूर या कार्यालयात येवून तेथे श्री.अरूण देवकर, पोलीस उपअधिक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, सोलापूर यांच्या समक्ष तक्रार नोंदवली. सदर तक्रारीवर पुढील कार्यवाही करण्यासाठी श्री. देवकर यांनी श्री.इंगळे व श्री.चव्हाण यांना पंच म्हणून उपलब्ध करून घेवून त्यांची पंच म्हणून काम करण्यासाठी संमती घेण्यात आली. सदर उपलब्ध पंचाची ओळख करून घेतल्यानंतर सापळा अधिकारी श्री.देवकर यांच्या सुचनेनुसार मी पुन्हा पंचांसमक्ष माझी तक्रार सविस्तर कथन केली. तसेच सापळा अधिकारी श्री.देवकर यांनी दिलेली तक्रार दोन्ही पंचांना दाखवली. त्यावर व सोबतचे कागदपत्रावर दोन्ही पंचांनी व श्री.देवकर यांनी सह्या केल्या. त्यानंतर श्री.देवकर, पोलीस उपअधिक्षक ॲन्टी करप्शन ब्युरो,सोलापूर यांनी मी दिलेल्या तक्रारीची पडताळणी करण्याचे ठरवले. त्यासाठी मी व माझ्या सोबत पंच नं 1 इंगळे यांनी भूसंपादन कार्यालय क्र 1, सोलापूर येथे जावून तेथे श्री.कुलकर्णी व श्री.शेख यांची भेट घेवून त्यांच्याशी अर्जावरील कार्यवाहीबाबत चर्चा करण्याबाबत चर्चा करावी. त्यावेळी त्यांनी लाचेची मागणी केल्यास थोड्यावेळात आणून देत असल्याबाबत सांगावे, तसेच आम्हास व्हईस रेकर्डर दाखवून त्याविषयी माहिती दिली व त्यामध्ये नवीन मेमरी कार्ड टाकण्यात आले. त्यानंतर पडताळणीबाबतच्या सविस्तर सुचना देवून मला व पंच इंगळे यांना भूसंपादन कार्यालयाकडे माझ्या गळ्यात व्हईस रेकडर शर्टाचे आतील बाजूस आडकावून मोटार सायकलवरून पाठवले. त्यावरून मी व पंच नं 1 इंगळे यांच्या समक्ष श्री.कुलकर्णी व श्री.शेख यांचे भेट घेवून माझ्या नोटीसवरील नावे कमी करण्याबाबत चर्चा केली असता श्री.कुलकर्णी यांनी मला त्यांच्या कार्यालयातील संगणकावर अर्ज टंकलिखीत करून दिला. तसेच काही तरी थोड फार रक्कम देण्याबाबत सांगितले. त्यावरून मी व पंच इंगळे परत ॲन्टी करप्शन कार्यालयात परत आलो. तेथे श्री.देवकर, पोलीस उपअधिक्षक ॲन्टी करप्शन ब्युरो,सोलापूर यांनी माझ्या गळ्यातील व्हईस रेकडर काढून पंच इंगळे व मला हकीकत विचारून घेतली. त्यामध्ये आम्ही उपरोक्त प्रमाणे घडलेली हकीकत सांगितली. त्यानंतर श्री. देवकर, पोलीस उपअधिक्षक ॲन्टी करप्शन ब्युरो,सोलापूर यांनी व्हईस रेकडरमध्ये माझ्यात व श्री.कुलकर्णी तसेच शेख यांच्या झालेले संभाषण ऐकले. त्यामध्ये श्री.कुलकर्णी यांनी लाचेची मागणी केली परंतू लाचेची किती रक्कम द्यायाची हे स्पष्ट होत नसल्याने पुन्हा एकदा पडताळणीसाठी पाठवण्याचे सर्वानुमते ठरवले. पुरवणी :- फिर्यादी संजय बाबू राठोड, वय 32 वर्षे, धंदा शेती, रा.नागूर तांडा, मैंदर्गी, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर यांचे दि.04.02.2019 रोजीचे फिर्यादी जबाबालगतचे असे.

------------------------------------------------------------------------------------------------ त्यासाठी मला व पंच नं 1 इंगळ यांना सविस्तर सुचना देवून पुन्हा व्हईस रेकर्डर गळ्यात शर्टाचे आतील बाजुस आडकावून पुन्हा भूपसंपादन कार्यालयात पाठवले. त्यावेळी मी पंच इंगळे यांच्या समक्ष कुलकर्णी यांची भेट घेवून किती रक्कम द्यायची याबाबत चर्चा करता त्यांनी 500/- रूपये लाचेची मागणी केल्याचे स्पष्ट झाले. सदरबाबत श्री.देवकर, पोलीस उपअधिक्षक ॲन्टी करप्शन ब्युरो,सोलापूर यांनी दोन पंचासमक्ष सविस्तर पडताळणी पंचनामा ॲन्टी करप्शन ब्युरो,सोलापूरच्या कार्यालयात दि.04.02.2018 रोजी करण्यात आलेला आहे. त्यानंतर श्री.देवकर, पोलीस उपअधिक्षक ॲन्टी करप्शन ब्युरो,सोलापूर यांच्या सुचनेवरून मी श्री.कुलकर्णी व श्री.शेख यांना देण्यासाठी 500/- रूपये त्यात 100/- रूपये दराच्या 5 नोटा होत्या. सदर नोटांना ॲंथ्रासीन पावडर लावण्याचा, त्याचे प्रात्याक्षीक करण्याचा व सापळा कारवाईमध्ये करावयाच्या कामाच्या सुचनांचा सविस्तर सापळापूर्व पंचनामा ॲन्टी करप्शन ब्युरो,सोलापूरच्या कार्यालयात करण्यात आला. त्यानंतर यातील श्री.कुलकर्णी व श्री.शेख यांच्यावर भूसंपादन कार्यालय क्र 1, सोलापूर येथे लाचेचा सापळा आयोजीत केला. त्यामध्ये मी व पंच नं 1 इंगळे असे दोघेजन माझ्या मोटार सायकलवरून व उर्वरीत सापळा पथक खाजगी जीप क्रमांक एम.एच.13 बी.एन.3271 मधून भूसंपादन कार्यालय, सोलापूर येथे गेलो. तेथे मी पंच नं 1 इंगळे यांच्यासह भूसंपादन कार्यालयात गेलो असता कार्यालयात श्री.कुलकर्णी व श्री. शेख हे हजर होते. त्यावेळी शेख यांची भेट घेतली असता त्यांनी माझ्याकडे लाचेची मागणी केली. त्यावेळी मी माझ्या शर्टाच्या खिश्यामध्ये ठेवलेल्या लाचेच्या नोटांची घडी उजव्या हाताने काढून श्री.शेख यांच्या समोर धरली असता त्यांनी ती लाचेची रककम उजव्या हाताने स्विकारून दोन्ही हाताने मोजून ती रक्कम ते उभा असलेल्या टेबलच्या मधील बाजूस ठेवली असता पंच इंगळे यांनी केलेल्या नियोजीत इशाऱ्यावरून सापळा पथकातील अधिकारी व कर्मचारी यांनी कार्यालयात येवून श्री.शेख यांना रंगेहात पकडण्यात आले आहे. त्यानंतर दोन्ही पंचासमक्ष श्री.शेख यांचे दोन्ही हातांची, पन्टची अ.वा. दिव्याच्या निळे प्रकाशात तपासणी केली असता त्यांचे दोन्ही हातांच्या बोटाच्या पेऱ्यावर व रक्कम ठेवलेल्या ठिकाणी अ.पा.ची निळसर चकाकी दिसून आली. तसेच टेबलवर मिळून आलेल्या नोटांची सापळापूर्व पंचनाम्यात नमूद केलेल्या नोटांच्या नंबरांशी पडताळणी करता ते तंतोतंत मिळून आले. तसेच सदर नोटांची देखील अ.वा.दिव्याचे निळ्या प्रकाशात तपासणी करता त्या नोटांवर देखील अ.पा.ची निळसर चकाकी दिसून आली आहे. सदरच्या नोटा पुराव्याकामी जप्त करण्यात आलेली आहे.सदरबाबत सविस्तर यशस्वी सापळा पंचनामा ॲन्टी करप्शन ब्युरो,सोलापूरच्या कार्यालयात दि.04.02.2019 रोजी पूर्ण करण्यात आलेला आहे. तरी लोकसेवक श्री.नरसिंह एकनाथ कुलकर्णी, वय 67 वर्षे, कंत्राटी नायब तहसीलदार, भूसंपादन कार्यालय क्र 1, सोलापूर, रा. 47 बी, अंत्रोळीकर नगर भाग 1, होटगी रोड, सोलापूर यांनी आपले लोकसेवक पदाचा दुरूपयोग करून त्यांना कायद्याने मिळावयाचे त्या खेरीज लाच म्हणून माझ्या नावे असलेल्या जमिनीतील काही भाग हा सोलापूर ते गुलबर्गा या महामार्गाच्या विस्तारणीकरणासाठी संपादीत करण्यात आलेली असताना सदर जमिनीचा मोबदला मिळण्यासाठी भूसंपादन कार्यालय क्र 1, सोलापूर यांचेकडून नोटीस काढण्यात आलेल्या नोटीसवर चूकीची नावे लावली असल्याने ती नावे कमी करण्याच्या अर्जावर कार्यवाही करण्यासाठी 500/- रूपये लाचेची मागणी करून ती लाचेची रक्कम दि.04.02.2019 रोजी 17.30वा. भूसंपादन कार्यालय क्र 1, सोलापूरच्या कार्यालयात श्री.सलीम चाँदसाहेब शेख वय 47 वर्षे, लिपीक, भूसंपादन कार्यालय क्र 1, सोलापूर, रा. मंद्रुप, ता. दक्षीण सोलापूर यांचेमार्फत स्विकारून सांपत्तीक फायदा x MxM स्वरूपाचे वर्तन केले आहे म्हणुन माझी श्री.नरसिंह एकनाथ कुलकर्णी, वय 67 वर्षे, कंत्राटी नायब तहसीलदार, भूसंपादन कार्यालय क्र 1, सोलापूर, रा. 47 बी, अंत्रोळीकर नगर भाग 1, होटगी रोड, सोलापूर व श्री.सलीम चाँदसाहेब शेख वय 47 वर्षे, लिपीक, भूसंपादन कार्यालय क्र 1, सोलापूर, रा. मंद्रुप, ता. दक्षीण सोलापूर यांचेविरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 चे कलम 7,12 प्रमाणे फिर्याद आहे. माझा वरील फिर्यादी जबाब हा संगणकावर टंकलिखीत करण्यात आलेला असून तो प्रींट काढल्यानंतर मी वाचून पाहिला तो माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर आहे. हा जबाब दिला स.ता.म समक्ष (अरूण देवकर)सहा.पोलीस आयुक्त/पो.उपअधिक्षक ॲन्टी करप्शन ब्युरो, सोलापूर

Scanned by CamScanner

**13.Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at** **(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

**(1) Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** Narsing Ganpathrao Ankushkar(I (Inspector)) / POBN54775 **or**

**(2) Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे** मा.श्री. अमोल देवकर सो **Rank (पद):** पो.उप-अधिक्षक ACB सोलापूर.

**No.(क्र.):** **to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or**

**(3) Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

**(4) Transferred to P.S.(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):**

**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

**14.Signature/Thumb impression of the complainant / informant.(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

**15.Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

पोलिस ठाणे अमंलदार
सदर बझार पोलिस स्टेशन

**Signature of Officer in charge, Police Station** **(ठाणे प्रभारी अधिका-याची**

**Name (नाम):** Narsing Ganpathrao Ankushk
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** POBN54775

Scanned by CamScanner